ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ] [ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4

Total No. of Questions : 26 ] [ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 458-M (RS)**

**Code No. : 458-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ

# D.El.Ed. SECOND YEAR

# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು — ವಿಜ್ಞಾನ (ಐಚ್ಛಿಕ ವಿಷಯ)

# FACILITATING LEARNING — SCIENCE ( OPTIONAL )

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 22. 05. 2019 ]

Date : 22. 05. 2019 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ] [ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60

Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ] [ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*

*Register Number of the Candidate*

**भाग - I**

खालील प्रत्येक प्रश्नाला **चार** पर्याय दिलेले आहेत. अति योग्य उत्तर निवडा आणि उत्तर पत्रिकेत लिहा. सर्व प्रश्न सक्तीचे आहेत. $10 \times 1 = 10$

1. विचारणेच्या विषयावर अवलंबून तपास हा आहे.

   I. वर्णनात्मक

   II. तुलनात्मक

   III. प्रायोगिक.

   यापैकी :

   (A) I फक्त (B) II फक्त

   (C) I आणि II (D) I, II आणि III.

2. कर्नाटकातील दक्षिण कन्नड जिल्हयातील काजूच्या बागेवर फवारा मारलेले कोटकनाशक हे आहे.

(A) डीडीटी (B) इंडोसल्फान

(C) मेथॉमाईल (D) फ्लोनिकॅमिड.

3. सूर्यप्रकाशाच्या अनुपस्थितीत वनस्पतीना श्वसनासाठी आवश्यक असलेला वायू हा आहे.

(A) आक्सीजन (B) कर्बवायू

(C) नैट्रोजन (D) अरगॉन.

4. जेव्हा घनाच्या पृष्ठभागावरील कणांना वायूत रूपांतर होण्यासाठी मिळविलेल्या पुरेशा ऊर्जेला असे म्हणतात.

(A) गोठणे (B) संप्लवन

(C) वितळणे (D) वाष्पीभवन.

5. टोळाच्या शरोराच्या कोणत्या भागाकडून पाय आणि पंख बाहेर पडतात ?

(A) डोके (B) छाती

(C) उदर (D) छाती आणि उदर.

6. सहयोगी आणि सहकारी अध्ययनाला रचनावादाच्या सिद्धांतामध्ये पाठिंबा देत नसलेला घटक हा आहे.

(A) शिक्षकाची भूमिका सुलभकर्त्याप्रमाणे

(B) आंतर स्वातंत्र्यावर भर देणे

(C) वैयक्तिक अध्ययनावर भर देणे

(D) गटानुसार अध्ययन कार्याची रचना करणे.

7. "विज्ञान हा शब्द क्रियापद असून नाम नाही." या विधानाला अति पूरक असलेला घटक हा आहे.

(A) सायटीआ ( Scientia ) या शब्दापासून विज्ञान घेतलेले आहे

(B) सिद्धांताचा संग्रह म्हणजे विज्ञान आहे

(C) ऐकून अध्ययन करण्यासाठी विज्ञान हे पूरक आहे

(D) करत शिकणे या संकल्पनेवर आधारित विज्ञान आहे.

8. पक्षांच्या निरीक्षणासाठी मुलांना घेऊन क्षेत्र सहलीला गेल्यावर उपयुक्त असलेले निरीक्षण साधन हे आहे.

(A) विशालन काय / भिंगे (B) दूरदर्शक

(C) दुर्बिण (D) कॅलेडीस्कोप.

9. **विधान (A) :** विद्यार्थ्यांविषयीचा संपूण निष्कर्ष काढण्यासाठी शेवटी शिक्षकाला संकलनात्मक मौल्यमापन मदत करते.

**कारण (R) :** घटकांशी संबंधित असणारी विद्यार्थ्यांची पाठ्याधारित उद्दिष्ट्ये तसेच अध्ययन फलीते यांची पुनर्तपासणी केली जाते.

(A) **A** आणि **R** हे दोन्हीही बरोबर आहेत आणि **R** हे **A** ला पूरक ( समंजस ) आहे

(B) **A** बरोबर आहे परंतु **R** हे चूक आहे

(C) **A** आणि **R** दोन्हीही चूक आहे

(D) **A** आणि **R** हे दोन्हीही बरोबर आहेत परंतु **R** हे **A** ला पूरक ( समंजस ) नाही.

10. पाताबिंदूनी युक्त असणारी, संकल्पना दर्शविणारी आणि पात बिंदूच्या जोडीतील नांवे दिलेल्या रेषेतील संबंध दर्शविणाऱ्या आकृतीला असे म्हणतात.

(A) टिपणी सहीत आकृती (B) आलेखीय संघटक

(C) शोर्षक (D) संकल्पना नकाशा.

## भाग - II

खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांचो उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये. $5 \times 2 = 10$

11. विज्ञान आणि तंत्रज्ञानाने समाजामध्ये निर्माण केलेल्या कोणत्याही दोन आव्हानांना तुम्ही उपाय सुचवा. थोडक्यात वर्णन करा.

12. "परिणामकारक संपर्क" या कौशल्य प्रक्रियेची कोणतेही चार सुचिते लिहा.

13. गांडूळाच्या अभ्यासाच्या प्रक्रियेचे थोडक्यात विश्लेषण करा.

14. जोयस आणि वेईल ( Joyce and Weil ) च्यानुसार अध्यापनाची चार कुटुंबे कोणती ?

15. आयोजनात्मक अध्ययन वातावरण निर्माण करण्यासाठी तुम्ही तुमच्या वर्गखोलीचे कसे आयोजन कराल ?

16. उच्च प्राथमिक शाळेच्या विज्ञान पुस्तकाचे पृथःकरण करताना तुम्ही कोणतेही चार मुद्दे लक्षात ठेवले पाहिजेत ते लिहा.

17. "चर्चा हे एक परिणामकारी साधन आह." कोणत्याही दोन मुद्दाद्वारे हे विधान स्पष्ट करा.

18. टिपणी सहीत आकृतीचे कोणतेही चार घटक लिहा.

## भाग - III

खालील प्रत्येक प्रश्नाला पर्यायी प्रश्न दिलेला आहे. त्यापैकी (a) किंवा (b) चे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर **एका** पानापेक्षा अधिक ( जास्त ) असू नये. $8 \times 5 = 40$

19. (a) "विज्ञान हे मूल्य मुक्त आहे." ही चूकीची समजूत तुम्ही समर्पक उदाहरणाने कशी स्पष्ट ( मूल्यांकन ) कराल ?

**किंवा**

(b) विज्ञान एक शाप किंवा वरदान आहे ? दळणवळण आणि आरोग्याच्या क्षेत्रावर आधारित तुमच्या उत्तराचे समर्थन करा.

20. (a) आहारातील प्रथिनाचे अस्तित्व निश्चित करण्यासाठी कोणत्या प्रयोगाची तुम्ही रचना कराल ? या प्रयोगाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये तुम्ही कोणत्याही दोन विकास कौशल्य प्रक्रियेची नांवे लिहा.

**किंवा**

(b) विज्ञान घटकांश गटवारीचे प्रत्येकी दोन समर्पक उदाहरणासह वर्गीकरण करा.

21. (a) रचनावादाच्या पाच तत्वांचे थोडक्यात वर्णन करा.

**किंवा**

(b) NCF-2005 च्या मते प्राथमिक शाळेतील विज्ञानाच्या अध्यापनाच्या ध्येय आणि उद्दिष्टांची यादी करा.

22. (a) "प्रत्येक बालक हे एक अद्वितीय आहे." या आश्रयाखाली दृष्टीदोष आणि श्रवणदोष असलेल्या विद्यार्थ्यांना तुम्ही तुमच्या वर्गखोलीमध्ये कशाप्रकारे भौतिक परिसराची व्यवस्था कराल ?

**किंवा**

(b) "मार्गदर्शक विचारणा" यामध्ये समाविष्ट असलेल्या पायऱ्या कोणत्या ? मार्गदर्शक विचारणा पद्धतीमध्ये शिक्षकाची भूमिका कोणती ?

23. (a) 5E अध्यापन नमुन्याच्या पायऱ्यांचा अवलंब करून विज्ञानातील तुमच्या निवडीच्या कोणत्याही पाठावर एक थोडक्यात पाठ योजना तयार करा.

**किंवा**

(b) वर्गीकरणशास्त्राच्या शैक्षणिक उद्दिष्टांच्या स्तराचे जनक कोण आहेत ? 'ऊर्जेचे प्रकार' या पाठावरील आकलन आणि विश्लेषण या ज्ञानात्मक कौशल्यासाठी प्रत्येकी दोन विशिष्ट उद्दिष्ट्ये लिहा.

24. (a) विद्यार्थ्यांमध्ये शाळेने ध्येयित केलेली तीन प्रकारची अध्ययने कोणती ? कोणत्याही दोन अध्ययनांचे थोडक्यात वर्णन करा.

**किंवा**

(b) संकल्पना संपादन नमुन्याची वाक्यरचना लिहा. थोडक्यात वर्णन करा.

25. (a) 'पाण्याचे संरक्षण' या पाठाचे अध्यापन करताना तुम्ही कोणती स्थानिक साधने वापराल ? कोणत्याही दोन स्थितींचे वर्णन करा.

**किंवा**

(b) उत्तम साधनाच्या लक्षणांचे वर्णन करा.

26. (a) विविध वर्गासाठी विज्ञानातील मासिके लिहीणे हे विद्यार्थ्यांच्या कल्पना विकसित करण्यासाठीचे मौल्यमापन साधन कसे आहे ?

**किंवा**

(b) आकलनात्मक मौल्यमापनासाठी वर्गखोलीतील कोणत्या प्रकारचे वातावरण पोषक ( पूरक ) आहे ? चर्चा करा.